MHKO070021272025

<u>फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (१९७४) चा अधिनियम दोन प्रकरण एकवीस अन्वये संक्षिप्त संपरीक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख</u>

**समरी फौ. ख. क्र.१००७/२०२५**

**निशाणी क्र. ४**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अपराध घडलेली तारीख | :- | २८.१०.२०२४ |
| २) | अहवाल/फिर्याद दाखल तारीख | :- | २८.१०.२०२४ |
| ३) | फिर्यादीचे नांव | :- | महाराष्ट्र शासन |
| ४) | आरोपीचे नांव | :- | **अमर राजेंद्र माने**, व.व.२६, व्यवसाय- पान शॉप<br>रा जयहिंद नगर, चुनाभट्टी, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर |
| ५) | कलम अधिनियम | :- | सिगारेट अँड टोबॅको प्रोडक्टस् कायदा २००३ चे कलम २० प्रमाणे. |
| ६) | अपराधाचा तपशिल | :- | खालीलप्रमाणे |

दिनांक २८.१०.२०२४ रोजी १०.४५ वाजणेचे सुमारास शिरोळ गावचे हद्दीत शिरोळ तहसिल कार्यालयासमोर रोड लगत असलेल्या तिरंगा पान शॉप, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर येथे तुम्ही आरोपी कातरुन बारीक केलेली सुपारी २ किलो व एकूण २६ प्लास्टीक पुडया त्यामध्ये सुगंधी तंबाखु, सुपारीचे मिश्रण करुन भरलेल्या त्यावर कोणतेही लेबल न लावता अथवा त्याचेवर सुरक्षेबाबत वैधानिक इशारा लिहीलेला नसताना विक्री करताना मिळून आला व त्याद्वारे सिगारेट अँड टोबॅको प्रोडक्टस् कायदा २००३ चे कलम २० प्रमाणे गुन्हा केला, जो की या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा आहे.

७)                                    -: **<u>आरोपीचे प्रतिकथन</u>** :-

<u>प्रश्न क्रं. १</u> :-  तुम्हाला अपराधाच्या नकला मिळाल्या काय ?

<u>उत्तर</u>          :-होय.

<u>प्रश्न क्रं. २</u> :-  आता वाचून दाखविलेल्या अपराधाचा आरोप तुम्हाला समजला काय ?

<u>उत्तर</u>          :- होय.

<u>प्रश्न क्रं. ३</u> :-  तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

<u>उत्तर</u>          :- मला गुन्हा कबूल आहे. मी स्वइच्छेने गुन्हा कबुल करीत आहे.

-------------                                    (**एम.एस.पाटील** )

आरोपीची सही                                    प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी, (कोर्ट २)

दिनांकः२९/०४/२०२६                                    जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**<u>प्रमाणपत्र</u>**

असे प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त आरोप हे आरोपीस त्याच्या मातृभाषेत वाचुन व समजावून सांगण्यात आले.

..................                                    (**एम.एस.पाटील** )

आरोपीची सही                                    प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी, (कोर्ट २)

दिनांकः२९/०४/२०२६                                    जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**एम.एस.पाटील, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.०२, जयसिंगपूर यांचे न्यायालयात**

**न्यायनिर्णय**

**<u>(घोषीत दिनांक २९/०४/२०२६ )</u>**

आरोपी यांनी नि.७ कडे पुरसिस/अर्ज देवून सिगारेट ॲंड टोबॅको प्रोडक्टस् कायदा २००३ चे कलम २० प्रमाणे गुन्हा केल्याचे कबूल केले आहे.

आरोपी हा आजरोजी न्यायालयात हजर असून त्याचे प्रतिकथन नोंदवले. त्याने गुन्हा स्वइच्छेने कबुल असल्याचे सांगीतले व सदरचा गुन्हा त्याला मान्य व कबुल असल्यामुळे कमीत कमी दंडावर सोडून देण्याची विनंती नि.७ कडील पुरसीस वजा अर्जाद्वारे केली आहे. प्रस्तुत आरोपीला सदर गुन्हयास असणा-या शिक्षेबद्दल सांगीतले असता त्याने त्यास गुन्हा मान्य असल्याचे कबुल केले. प्रस्तुत

आरोपी हा सदर गुन्हयास असलेल्या शिक्षेबद्दल सांगून देखील तो गुन्हा मान्य करीत आहे. त्यामुळे आरोपीने दिलेल्या अपघाताची कबुली स्विकारण्यात येते व आरोपीस सिगारेट अँड टोबॅको प्रोडक्टस् कायदा २००३ चे कलम २० या गुन्हयामध्ये दोषी धरण्यात येते.

शिक्षेच्या मुद्दयावर आरोपी, आरोपीचे विधीज्ञ तसेच अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपीने असे नमुद केले की, तो घरातील कर्ता इसम असून त्याची परिस्थिती हालाखीची आहे. तसेच आरोपीच्या हातून नकळत गुन्हा घडलेला आहे व त्यास त्याबाबत पश्चाताप झाला असून त्यांना कमीत कमी दंडाची शिक्षा व्हावी अशी आरोपीने विनंती केली आहे. प्रस्तुत आरोपीस अशा प्रकारच्या गुन्हयामध्ये पुर्वी शिक्षा झाल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. आरोपीच्या हातून प्रथमच सदरचा गुन्हा घडल्याचे दिसून येते. त्यामुळे गुन्हयाचे स्वरुप व आरोपी स्वइच्छेने त्याचा अपराध मान्य करत असल्यामुळे केवळ कारावासाच्या शिक्षेपुरती सौम्यता दाखवणे योग्य होईल. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी **अमर राजेंद्र माने** यास **भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५** अन्वये सिगारेट अँड टोबॅको प्रोडक्टस् कायदा २००३ चे कलम २० अंतर्गत दोषी ठरविणेत येत असून आरोपीने सदर गुन्हयासाठी रक्कम रुपये १०००/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) द्रव्यदंड भरावा. दंड न भरलेस आरोपीस ०१ (एक) दिवसांची साधी कैद सुनावणेत येत आहे.

२. सदर कामात कोणताही मुद्देमाल जप्त नसल्याने मुद्देमालाबाबत कोणताही आदेश करण्यात आलेला नाही.

३. न्यायनिर्णयाची एक प्रत आरोपीस मोफत देणेत यावी.

४. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर व उद्घोषित करण्यात आला.

PATIL MAYUR SAMPAT
Digitally signed by PATIL MAYUR SAMPAT
Date: 2026.04.29 15:58:51 +0530

जयसिंगपूर. **( एम.एस.पाटील )**

दिनांक. २९/०४/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट नं.२

जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर